।। श्री ।।
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com
■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ४६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

*** सुविचार ***
काळानुसार बदललात तरच जीवनात प्रगती कराल, कारण बदल हाच निसर्गाचा नियम आहे.

# जंतर मंतरवर आंदोलकांवर पोलिसांचा लाठीचार्ज

## पोलिसांचा अत्यंत निर्दयीपणे मुलींवर लाठीचार्ज । आपच्या आमदारांनाही बॅरिकेटस्वर फेकले

**● नवी दिल्ली । वीरभूमी –** दिल्ली पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जवरून कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. दिल्लीतील पुरुष पोलिसांनी मुलींवर लाठीचार्ज केल्याचेही त्यांनी सांगितले. हे सरकार नीटच्या २० विद्यार्थ्यांचा जीव घेतल्यानंतर देखील समाधानी नाही. आता ते दुसऱ्यांचे रक्त काढू पाहात आहेत, असा आरोप त्यांनी केला.

कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दिपके म्हणाले की, पुरुष पोलिस अधिका-यांनी मुलींवर लाठीहल्ला केला. सरकारकडून गुंडागर्दी केली जात आहे. या सरकारमुळे २० मुलांनी आत्महत्या केली. मुलांचे रक्त वाहायचे आहे, असे अभिजीत दिपके म्हणाले. सीजेपीने सोशल मीडियावर पोस्ट करत दिल्ली पोलिसांनी केलेल्या कारवाईवर भाष्य केले. आम्ही तिरंगा हाती घेतला, त्यांनी लाठी उचलली. आम्ही पुस्तके हातात घेतली, त्यांनी अश्रूधुराच्या नळकांड्या चालवल्या. आम्ही संविधान



दाखवले, त्यांनी हुकुमशाही केली. दिल्ली पोलिसांनी संसदेतील त्यांच्या मालकांच्या वतीने निष्पाप विद्यार्थ्यांना बेदम मारहाण केली, यासाठी आजचा दिवस लक्षात ठेवला जाईल, असे सीजेपीने म्हटले.

अभिजीत दिपके, सौरव दास, आशुतोष रांका आणि सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अजून जंतरमंतरवर धरणे आंदोलन करत आहेत. ते सर्व जण केरळ हाऊससमोर आहेत. शांततापूर्ण विरोध संपणार नाही, असे सीजेपीकडून सांगण्यात आले.

मोर्चादरम्यान दिल्ली पोलिसांनी केलेल्या अमानुष कारवाईचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. मोर्चात सहभागी झालेले आम आदमी पक्षाचे तीन वेळेचे आमदार अखिलेश त्रिपाठी यांना पोलिसांनी उचलून थेट बॅरिकेट्सवर फेकून दिल्याने खळबळ उडाली.आक्रमक मोर्चेकरांनी हे बॅरिकेट्स पार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अखिलेश त्रिपाठी यांना उचलून फेकून दिले. आंदोलकांनाही निर्दयीपणे फेकले, लाठीमार केला.

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान अमित शाह यांच्या भेटीला

**● नवी दिल्ली । वीरभूमी–** नीट परीक्षेच्या गैरव्यवहार प्रकरणात दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन सुरू होते. आज पावसाळी अधिवेशनाला सुरूवात झाली. थेट संसद भवनाकडे मोर्चा निघाला. आता हा मोर्चा संसद भवनाच्या परिसरात पोहोचला आहे. संसदेचे गेट बंद करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक रूग्णालयात आहेत. त्यांनी आंदोलनात सहभागी होण्यासाठी पत्र दिले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. संसद भवनाच्या परिसरात गोंधळ उडाला. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याकरिता आंदोलक आक्रमक झाली आहेत. यादरम्यानच दिल्लीमध्ये मोठ्या घडामोडी घडत आहेत.

संसद भवन परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला. अभिजीत दिपके संसद भवनाकडे जाण्यासाठी आग्रही आहेत. अश्रूधुराच्या नळकांड्या फेकल्या आहेत. आंदोलकांना पांगवण्याचे काम सुरू आहे. संसदेचे मुख्य गेटही बंद करण्यात आले.

संसदेचे कामकाज स्थगित करण्यात आले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान अमित शाह यांच्या भेटीला पोहोचले आहेत. कारण आंदोलकांची मुख्य मागणी आहे की, धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. सोनम वांगचुक यांनी आंदोलन मागे घेण्याबाबत भाष्य केले. पण त्यांनी सरकार पुढे ३ महत्वाच्या अटी ठेवल्या आहेत.

## SPOT NEWS

### स्पेनचा फुटबॉल विश्वावर पुन्हा झेंडा

**● नवी दिल्ली –** फिफा विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात स्पेनने दमदार आणि शिस्तबद्ध खेळाचे दर्शन घडवत गतविजेत्या अर्जेंटिनाचा १–० असा पराभव केला आणि तब्बल १६ वर्षांनंतर पुन्हा एकदा फुटबॉल विश्वावर आपला झेंडा फडकावला. न्यूयॉर्क–न्यू जर्सी स्टेडियमवर झालेल्या या थरारक अंतिम लढतीत निर्धारित ९० मिनिटांत दोन्ही संघांना गोल करता आला नाही. मात्र अतिरिक्त वेळेत स्टार आक्रमक फेरान टोरेस याने केलेल्या निर्णायक गोलमुळे स्पेनने इतिहास रचत दुसरे विश्वविजेतेपद पटकावले. हा अंतिम सामना जगातील दोन बलाढ्य फुटबॉल महासत्तांमधील संघर्ष म्हणून ओळखला जात होता. एका बाजूला अनुभवी लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखाली सलग दुसऱ्या विश्वविजेतेपदाचे स्वप्न पाहणारा अर्जेंटिना होता, तर दुसऱ्या बाजूला युवा जोश, वेगवान पासिंग आणि सामूहिक खेळाच्या बळावर स्पर्धेत वर्चस्व गाजवणारा स्पेन होता. अखेरीस स्पेनच्या संयमी आणि तांत्रिक खेळापुढे अर्जेंटिनाचा अनुभव कमी पडला.

### आता शिक्षकांच्या कामावर व्हॉट्सॲपवरून नजर!

**● मुंबई –** राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षण विभागाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता जिल्हा स्तरावर विषयनिहाय शिक्षकांच्या 'विषय समित्या' स्थापन करण्याचा आदेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिला आहे. शिक्षण आयुक्तांनी ८ जुलै २०२६ रोजी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये अद्याप अशा समित्या स्थापन झालेल्या नाहीत, तेथे त्या तात्काळ स्थापन करण्याचे आदेश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. 'परख' सर्व्हेक्षणानुसार इयत्ता सहावी आणि नववीतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे समोर आले होते. या पार्श्वभूमीवर इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी विषय समित्यांनी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. स्थापन करण्यात आलेल्या सर्व विषय समित्यांचा अहवाल संबंधित कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## मंत्रालयातील चहापानासाठी अशुद्ध पाण्याचा वापर; धक्कादायक प्रकार उघडकीस

**● मुंबई । वीरभूमी–** मंत्रालयातील दूषित पाण्याने अधिकारी-कर्मचा-यांचे आरोग्य बिघडले असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चहापानासाठी अशुद्ध पाणी वापरले गेल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला. खुद्द मुख्यमंत्र्यांनी त्यांना देण्यात आलेल्या कॉफीला वास येत असल्याची तक्रार केली. तेव्हापासून मुख्यमंत्र्यांच्या चहा, कॉफीसाठी बाटलीबंद मिनरल पाण्याचा वापर सुरू झाला आहे.

मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील मुख्यमंत्री कार्यालयात अनेक महत्वाच्या बैठका होतात. बैठकीच्या निमित्ताने येणारे मंत्री महोदय, लोकप्रतिनिधी, सनदी अधिकारी, अति महत्वाच्या व्यक्तींचे चहापान देऊन आदरातिथ्य केले जाते. त्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाला लागून छोटी कॅन्टीन आहे. अशाच एका बैठकीसाठी मुख्यमंत्र्यांना कॉफी देण्यात आली. त्यावेळी कॉफीला वास येत असल्याची तक्रार फडणवीस यांनी केली. या तक्रारीनंतर मुख्यमंत्री कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्याने चहा व कॉफी तयार करणाऱ्या कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेतली.

मंत्रालयातील पाणी दूषित आणि जीवाणू मिश्रित असल्याचे काही दिवसांपूर्वी उघडकीस आले. या पाण्यामुळे मंत्रालयातील जवळपास ४० ते ५० टक्के अधिकारी कर्मचा-यांना जुलाब, ताप, उलटीचा त्रास सुरू झाला. काहींना तर दूषित पाण्याने काविळ झाल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल व्हावे लागले. या पार्श्वभूमीवर मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने खुद्द मुख्यमंत्र्यांना अशुद्ध पाण्याचा त्रास जाणवल्याची माहिती दिली.

दूषित पाण्याने त्रास झाल्याने अधिकारी - कर्मचाऱ्यांनी मंत्रालयातील पाण्याचा चांगलाच धसका घेतला आहे. मंत्रालयातील पाणी पिण्याऐवजी अधिकारी-कर्मचा-यांनी आता स्वखर्चाने बाटलीबंद पाणी वापरण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, मंत्रालयातील दूषित पाणी पुरवठ्याला सार्वजनिक बांधकाम विभागाचा हलगर्जीपणा कारणीभूत असल्याचे अधिकारी-कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. मंत्रालयातील दूषित पाण्याची समस्या अद्याप दूर झाली नसल्याने काही अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची भेट घेऊन बांधकाम विभागाबद्दल तक्रार केल्याचे समजते.

## आषाढी वारीसाठी अहिल्यानगरला ६१.७६ लाखांचा अतिरिक्त निधी : पालकमंत्री विखे पाटील

### वारकऱ्यांच्या सोयींसाठी महायुती सरकारचा निर्णय

**● लोणी । वीरभूमी–** आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजने' अंतर्गत जिल्ह्याला ६१ लाख ७६ हजार रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर झाल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

आषाढी वारीदरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यातून विश्वगुरू संत निवृत्ती महाराज, संत श्री एकनाथ महाराज, श्री संत निळोबाराय महाराज तसेच श्री ज्ञानेश्वर आषाढी वारी पालखी (नेवासा) यांच्यासह अन्य



पालख्या पंढरपूरकडे प्रस्थान करतात.

वारकऱ्यांसाठी तात्पुरती शौचालये, स्वच्छतागृहे, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, औषधांचा पुरवठा आणि जलरोधक मंडप उभारणीसाठी यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता.

या योजनेअंतर्गत अतिरिक्त निधी मंजूर करण्याची विनंती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली होती. त्यानुसार महायुती सरकारने हा अतिरिक्त निधी मंजूर केला आहे.

मागील दोन वर्षांप्रमाणे यंदाही पालकमंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने प्रशासनामार्फत पालख्या व वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आषाढी वारीत अहिल्यानगरच्या पालख्यांचे महत्त्व लक्षात घेऊन अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विखे पाटील यांनी आभार मानले आहेत.

# हरिश्चंद्रगडावर दरड कोसळून चार पर्यटक जखमी

## मालाडच्या पर्यटकांवर माती–दगडांचा मारा । तिघांची प्रकृती चिंताजनक, ग्रामस्थांच्या तत्परतेने जीव वाचले

**● अकोले । वीरभूमी –** हरिश्चंद्रगडावर रविवारी सुट्टीमुळे मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी झाली असताना आडव्या कड्याच्या मागील बाजूस अचानक माती व दगड कोसळून मालाड (मुंबई) येथील चार पर्यटक जखमी झाले. त्यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.


हरिश्चंद्रगड पाहून खाली उतरत असताना अचानक झालेल्या दरड कोसळण्यामुळे दोन पर्यटक माती व दगडांच्या ढिगाऱ्याखाली अडकले. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेल्या रेलिंगमुळे त्यांना आधार मिळाल्याने मोठी जीवितहानी टळली.

घटनेची माहिती सोबतच्या पर्यटकांनी आणि तेथे उपस्थित असलेल्या अमोल बादड यांनी तात्काळ ग्रामस्थ व वन विभागाला दिली. माहिती मिळताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पर्यटकांच्या मदतीने जखमींना माती व दगडांच्या ढिगाऱ्यातून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना पायथ्याशी आणून खासगी वाहनातून रवाना करण्यात आले. रस्त्यात १०८ रुग्णवाहिका मिळाल्यानंतर सर्व जखमींना राजूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

राजूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिनव लहामटे यांनी प्राथमिक उपचार करून सर्व जखमींना पुढील उपचारासाठी नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. त्यानुसार चारही जखमींना नाशिक येथे पाठविण्यात आले.

जखमींची नावे रामप्रकाश यादव, निलेश गोमाती विश्वकर्मा, कृष्णा कुमार साहू आणि दिनेश संजय साहू अशी असून, त्यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.





घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार, वनक्षेत्रपाल दत्तात्रय पडवळ तसेच वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बचावकार्यात सहभाग घेत जखमींना तातडीने नाशिक येथे उपचारासाठी हलविण्याची व्यवस्था केली.

# SPOT NEWS

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला शिक्षक, शिक्षकेतरांचा जाहीर पाठिंबा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

देशातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र आणि सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करण्याच्या मागण्यांसाठी दिल्लीच्या जंतर-मंतर येथे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला माध्यमिक शिक्षक संघ आणि अहिल्यानगर मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर समन्वय समितीने जाहीर पाठिंबा दर्शविला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघ (फेडरेशन) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनाच्या समर्थनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी शिक्षण क्षेत्रातील अनियमितता, स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटी, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी सुरू असलेला कथित खेळ आणि शिक्षकांवर वाढणाऱ्या अशैक्षणिक कामांच्या ओझ्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनादरम्यान संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय परिसर घोषणांनी दणाणून गेला. केंद्र शासनाने शिक्षण क्षेत्रातील गंभीर प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे, परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक व विश्वासार्ह करावी आणि विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास अबाधित राखण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आंदोलकांनी केली. या आंदोलनात समन्वय समितीचे अध्यक्ष सुनिल पंडित, सचिव आप्पासाहेब शिंदे, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सचिव अमोल ठाणगे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, सोपानराव कदम, प्रसाद सामलेटी, मंगेश पालवे, अमोल ठाणगे, वैभव सांगळे, तौसिफ शेख, रविंद्र पायमोडे, गोवर्धन पांडुळे, राहुल झावरे, प्रकाश पोटे, फारूक रंगरेज यांच्यासह विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटनांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## विद्यार्थी-युवकांच्या न्याय हक्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्यातील विद्यार्थी व युवकांच्या न्याय हक्कासाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील कथित अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अहिल्यानगर शहर व जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देत सरकारने विद्यार्थी व युवकांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील व देशातील लाखो विद्यार्थी आणि युवकांचे भविष्य धोक्यात आलेले असतानाही सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. आजचा विद्यार्थी आणि युवक हा देशाचा भविष्यकाळ असूनही सरकारचे शैक्षणिक धोरण आणि युवकांच्या प्रश्नांबाबतचे धोरण अत्यंत उदासीन व निराशाजनक असल्याचा आरोप करण्यात आला.

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ शेवगावात रास्ता रोको

**विविध पक्ष, सामाजिक संघटना व विद्यार्थ्यांचे आंदोलन । केंद्र सरकारच्या भूमिकेचा निषेध**

**● शेवगाव । वीरभूमी –**

लडाखचे पर्यावरणवादी व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी उपोषणस्थळावरून ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ तसेच दिल्लीतील जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी सोमवारी (ता. २०) सकाळी ११ वाजता शेवगाव येथील क्रांती चौकात विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि विद्यार्थ्यांच्या वतीने एक तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या रांगा लागल्या.

आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे प्रदेश सहसचिव अ‍ॅड. सुभाष लांडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तालुकाप्रमुख अ‍ॅड. अविनाश मगरे,



■ छाया । अमोल कराळे

विद्यार्थिनी प्रतिनिधी वैष्णवी बोडखे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख, भाकपचे बबन पवार, कानिफ कर्डिले, शिवाजी मडके, अजिंक्य लव्हाट, सलीम जिलानी, पप्पू गर्जे, दत्ता आरे, अशोक नजन यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी वक्त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. अ‍ॅड. सुभाष लांडे म्हणाले, नीट पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. या मागणीसाठी शांततेत आंदोलन करणाऱ्या सोनम वांगचुक यांना पहाटे ताब्यात घेणे ही लोकशाहीला न शोभणारी घटना असून, हा लोकशाहीचा अवमान आहे.

अ‍ॅड. अविनाश मगरे यांनी देशातील लोकशाही धोक्यात असल्याची भावना व्यक्त करत, गरीब व विद्यार्थ्यांसमोरील वाढत्या अडचणींकडे लक्ष वेधले.

प्रा. किसन चव्हाण यांनी स्वातंत्र्यलढ्यातील महात्मा गांधी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या संघर्षाचा उल्लेख करत, अन्यायाविरोधात युवकांनी एकत्र येऊन आवाज उठविण्याचे आवाहन केले.

यावेळी वैष्णवी बोडखे, अजिंक्य लव्हाट यांच्यासह विद्यार्थ्यांनीही आपली मते मांडली. सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा आणि केंद्र सरकारच्या भूमिकेचा निषेध नोंदवत हे रास्ता रोको आंदोलन शांततेत पार पडले. पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## कान्हुरपठारमध्ये गावठी दारू विक्रीवर कारवाई करण्याची मागणी

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील कान्हुरपठार गावात गेल्या काही दिवसांपासून गावठी दारू व ताडीच्या अवैध विक्रीत मोठी वाढ झाली असून, गावातील विविध भागांत सहा ते सात ठिकाणी हे अड्डे सुरू असल्याचा आरोप स्थानिक रहिवासी सुनील धोंडीभाऊ भालेकर यांनी केला आहे. या अवैध धंद्यांवर तातडीने धाड टाकून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी बीट अंमलदार (कान्हुरपठार) यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनानुसार, प्रगतशील गाव म्हणून ओळख असलेल्या कान्हुरपठारमध्ये गावठी दारू व ताडीच्या विक्रीमुळे शालेय विद्यार्थी आणि तरुण व्यसनाधीनतेच्या आहारी जात आहेत. तसेच किरकोळ भांडणे, वादावादी, कौटुंबिक कलहाच्या घटनांमध्ये वाढ होत असून, महिला व ज्येष्ठ नागरिकांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे.

गावात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीची माहिती असूनही कारवाई का होत नाही, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. मद्यपींमुळे रस्त्यावरून ये-जा करणेही त्रासदायक बनल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. गावठी दारूचे अड्डे तातडीने उद्ध्वस्त करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे सुनील भालेकर यांनी म्हटले आहे. या अर्जाची पोलीस प्रशासन दखल घेऊन ठोस कारवाई करणार का, याकडे आता कान्हुरपठार ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## भिंगाण परिसरात दलित-आदिवासी शेतकऱ्यांचा रस्ता अडवल्याचा आरोप; कारवाईची मागणी

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

तालुक्यातील भिंगाण खालसा व दुमाला परिसरातील पूर्वेकडे जाणारा चांडगाव-भिंगाण हा मुख्य रस्ता अडवून दलित व आदिवासी शेतकऱ्यांना शेतात जाण्यापासून रोखले जात असल्याचा आरोप युवक कार्यकर्ते धनंजय काळूराम ताडे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन संबंधितांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, शासनाकडून जमीन वाटप झालेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवर जाण्यास अडथळा निर्माण केला जात असून त्यामुळे खरीप हंगामातील पेरणी खोळंबली आहे. महसूल विभागाच्या मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनाही दमदाटी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच काही जणांकडून वरिष्ठ राजकीय नेत्यांशी संबंध असल्याची बतावणी करून प्रशासनावर दबाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

धनंजय ताडे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, त्यांच्या कुटुंबाच्या मटण व्यवसायाच्या दुकानात जाऊन जातीवाचक शिवीगाळ व धमकावण्याचे प्रकार घडले. तसेच आदिवासी भिल्ल समाजातील नागरिकांवर दबाव टाकून त्यांच्या जमिनी कमी दरात विकण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला जात असल्याचाही आरोप त्यांनी केला आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, तत्कालीन तहसीलदार मिलिंद कुलथे यांच्या आदेशानंतर संबंधित रस्ता पूर्वी सुरू करण्यात आला होता. मात्र, पुन्हा अडथळे निर्माण करून अनुसूचित जाती-जमातीच्या नागरिकांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या जमिनी पूर्वी आमच्याच होत्या, सरकारने तुम्हाला दिल्या आहेत; त्या आम्ही परत घेणार, अशा प्रकारच्या धमक्या दिल्या जात असल्याने परिसरातील आदिवासी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद आहे. या प्रकरणात आदेश आप्पासाहेब शेंडगे व आप्पासाहेब विठ्ठल शेंडगे यांच्यावर आरोप करण्यात आले असून त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, संबंधितांवर तातडीने कारवाई न झाल्यास आगामी काळात उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही युवक कार्यकर्ते धनंजय काळूराम ताडे यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

# अहिल्यानगर मान्सून हेल्थ वॉच : स्टार हेल्थकडून ताप, डेंग्यू आणि मलेरियाच्या धोक्याचा इशारा

**विमाधारक होम हेल्थकेअर आणि नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मदतीसाठी टॉक टू स्टारला ७२००२२२३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तर बिगर-विमाधारक स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सेवेचा लाभ घेऊ शकतात**

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगरमध्ये पावसाळा सुरू झाला असून या काळात डेंग्यू, मलेरिया, ताप आणि इतर संसर्गजन्य आजार सामान्यतः वाढतात. याच पार्श्वभूमीवर स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपनीने राज्यभरात आपली पावसाळी आरोग्य सेवा मोहीम अधिक तीव्र केली आहे. स्टार हेल्थच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या महाराष्ट्रातील आकडेवारीनुसार, ताप आणि संसर्गजन्य आजारांसाठी होम हेल्थकेअर सेवेचा वापर करणाऱ्यांच्या संख्येत पाच पटीने वाढ झाली आहे. या वाढीसोबत, कंपनीने देशभरात नुकत्याच सुरू केलेल्या व्हर्च्युअल ओपीडी सेवेलाही अभूतपूर्व मागणी मिळाली आहे, ग्राहक वैद्यकीय सल्ल्यासाठी पहिली पायरी म्हणून या सेवेला मोठ्या प्रमाणावर पसंती देत आहेत.

या मोहिमेचा मुख्य उद्देश विमाधारकांना टॉक टू स्टार आणि होम हेल्थकेअर मदतीशी जोडून आजाराच्या सुरुवातीच्या टप्प्यात मदत मिळवून देणे हा आहे. त्याच वेळी सर्वसामान्य जनतेला स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सेवेचा लाभ घेता येणार आहे. विमाधारकांसाठी टॉक टू स्टारचा ७२००२२२३३३ हा मार्गदर्शक संपर्क क्रमांक असेल, जिथे होम हेल्थकेअर सेवेसाठी १ दाबा आणि नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मदतीसाठी २ दाबा.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड श्री. विजय अरोरा म्हणाले, पावसाळ्यात ताप, डेंग्यू, मलेरिया आणि संसर्गजन्य आजार वाढणे स्वाभाविक असते, पण अनेकदा कुटुंबं लक्षणे गंभीर होईपर्यंत वाट पाहतात. या ऋतूत वैद्यकीय मदतीची पहिली पायरी सोपी करणे हाच आमचा प्रयत्न आहे. विमाधारक होम हेल्थकेअर किंवा नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मार्गदर्शनासाठी टॉक टू स्टारला ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तर सर्वसामान्य जनता मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सल्ला बुक करण्यासाठी स्टार हेल्थ ॲपचा वापर करू शकतात. या ऋतूत वेळेवर घेतलेला सल्ला खूप महत्त्वाचा ठरू शकतो.

**कमी खर्च आणि पावसाळ्यासाठी सज्ज केअर : होम हेल्थकेअरचे महत्त्व**

२०२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑफिसच्या कौटुंबिक आरोग्य खर्चावरील ८०व्या फेरीच्या सर्वेक्षणातील आकडेवारी आजारपण आणि रुग्णालयात दाखल होण्यामुळे कुटुंबांवर पडणारा आर्थिक भार अधोरेखित करते. महाराष्ट्रात खाजगी रुग्णालयात दाखल होण्याचा सरासरी खर्च ग्रामीण भागात ४४,५८० रुपये आणि शहरी भागात ६७,८३१ रुपये आहे, ज्यामध्ये रुग्णालयात दाखल होण्याच्या खर्चाचा जवळपास ९० टक्के हिस्सा व्यक्ती आणि कुटुंबांना स्वतःच्या खिशातून सोसावा लागतो.

स्टार हेल्थचा मान्सून सपोर्ट प्रोटोकॉल दोन स्पष्ट मार्ग तयार करून ही तफावत दूर करण्या-चे काम करतो आणि हे दोन मार्ग आहेत विमाधारकांसाठी टॉक टू स्टार आणि सर्वसामान्य जनतेसाठी स्टार हेल्थ कस्टमर ॲपद्वारे मोफत व्हर्च्युअल ओपीडी. एकत्रितपणे, या सेवा कुटुंबांना लक्षणे गंभीर होण्यापूर्वी किंवा रुग्णालयात जाण्याची वेळ येण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला घेण्याचा सोपा व जलद मार्ग उपलब्ध करून देतात.

या उपक्रमांतर्गत पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तीन अत्यंत महत्त्वाच्या आणि वेळेवर मिळणाऱ्या सेवा एकत्र आणल्या आहेत : विमाधारकांसाठी अमर्यादित टेलिकन्सल्टेशन्स (ऑनलाईन डॉक्टरांचा सल्ला): विमाधारक पॉलिसीच्या कालावधीत अमर्यादित वेळेस ऑनलाईन डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकतात. यामुळे ताप किंवा संसर्गाचे पहिले लक्षण दिसताच वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्यास प्रोत्साहन मिळते.

– विमाधारकांसाठी टॉक टू स्टार : विमाधारक मार्गदर्शनासाठी आणि मदतीसाठी ७२००२२२३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात. होम हेल्थकेअरसाठी १ दाबा आणि नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मदतीसाठी २ दाबा. ही सेवा ग्राहकांना उपचारांचे पर्याय, कॅशलेस प्रक्रिया, नेटवर्कमधील रुग्णालयांचे पर्याय आणि कोणती कागदपत्रे तयार ठेवायची हे समजून घेण्यास मदत करते.

– कॅशलेस होम हेल्थकेअर: पात्र विमाधारकांसाठी, ज्यांच्या आजाराचे व्यवस्थापन वैद्यकीय देखरेखीखाली घरीच केले जाऊ शकते, स्टार हेल्थ डॉक्टरांनी लिहून दिलेल्या घरगुती उपचारांचा खर्च उचलते. यामध्ये रुग्णाच्या घरी पुरवली जाणारी व्यावसायिक नर्सिंग सेवा, नियमित रक्त चाचण्या आणि देखरेख, सलाईन आणि इंजेक्शन या सेवांचा समावेश असू शकतो.

सर्वसामान्य जनतेसाठी मोफत व्हर्च्युअल ओपीडी : बिगर-विमाधारक आणि सर्वसामान्य नागरिक स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून या सेवेचा लाभ घेऊ शकतात, जिथे वापरकर्ते पावसाळ्यातील सामान्य लक्षणांसाठी मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सल्ला बुक करू शकतात.

### अहिल्यानगरसाठी महत्त्वाचे मुद्दे

- महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ताप आणि संसर्गजन्य आजारांसाठी स्टार हेल्थच्या होम हेल्थकेअरचा वापर करणाऱ्यांच्या संख्येत पाच पटीने वाढ झाली आहे.
- ग्राहक वैद्यकीय सल्ल्यासाठी पहिली पायरी म्हणून ऑनलाईन डॉक्टरांच्या सल्ल्याला मोठ्या प्रमाणावर पसंती देत असल्याने व्हर्च्युअल ओपीडीचा वापर वेगाने वाढत आहे.
- विमाधारक टॉक टू स्टारला ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात; होम हेल्थकेअरसाठी १ दाबा आणि नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मदतीसाठी २ दाबा.
- बिगर-विमाधारक स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सेवेचा लाभ घेऊ शकतात.

या सेवेचा लाभ घेण्यासाठी वापरकर्ते खालील पायऱ्यांचे अनुसरण करू शकतात : १. स्मार्टफोनवर स्टार हेल्थ कस्टमर ॲप डाऊनलोड करा. २. उपलब्ध आरोग्य फायद्यांचा लाभ घेण्यासाठी नाव, ईमेल आयडी आणि जन्मतारीख यासारख्या मूलभूत माहितीसह साइन अप (नोंदणी) करा. ३. ॲपमधील मेनू उघडा आणि 'टेलीमेडिसिन' पर्याय निवडा. ४. संबंधित क्षेत्रातील अनुभवी डॉक्टरांसोबत मोफत ऑनलाईन सल्लामसलत बुक करा.

या मोहिमेचा भाग म्हणून स्टार हेल्थ संपूर्ण राज्यातील कुटुंबांना, विशेषतः शाळकरी मुले आणि ज्येष्ठ नागरिक असलेल्या कुटुंबांना पावसाळ्यातील प्राधान्य आरोग्य नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत आहे: सतत येणाऱ्या तापाकडे दुर्लक्ष करू नका, सुरुवातीच्या टप्प्यातच वैद्यकीय सल्ला घ्या आणि मदतीसाठी योग्य मार्ग निवडा. विमाधारक टॉक टू स्टारला ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तर बिगर-विमाधारक स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सल्ला बुक करू शकतात.

या पावसाळ्यात राज्यातील कुटुंबांसाठी एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे: सतत येणाऱ्या तापाकडे दुर्लक्ष करता कामा नये आणि डॉक्टरांशी लवकर संपर्क साधल्यास, म्हणजेच विमाधारकांसाठी फोनद्वारे किंवा सर्वसामान्य जनतेसाठी मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडीद्वारे, लक्षणे गंभीर होण्यापूर्वी योग्य पावले उचलण्यास कुटुंबांना मदत होऊ शकते.

SPOT NEWS

## नागापूरमध्ये केचरा वेचकांना जनधन बँक खाते व ई-श्रम कार्डचे वाटप

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगर यांच्या पुढाकारातून नागापूर येथे कचरा वेचकांसाठी जनधन बँक खाते उघडणे व ई–श्रम कार्ड उपलब्ध करून देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. शहरातील स्वच्छता व्यवस्थेत मोलाचे योगदान देणारे कचरा वेचक अनेक वर्षांपासून असंघटित क्षेत्रात कार्यरत असून शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांपासून वंचित राहिले असून, ही परिस्थिती बदलण्यासाठी संघटनेने पुढाकार घेऊन हा उपक्रम राबविला. या उपक्रमाद्वारे पात्र कचरा वेचकांना प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत बँक खाती उपलब्ध करून देण्यात आली तसेच ई–श्रम कार्डची नोंदणी करण्यात आली. त्यामुळे शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजना, विमा संरक्षण आणि आर्थिक लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग अधिक सुलभ झाला आहे. उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आयडीबीआय बँक, सावेडी शाखेचे अधिकारी अरुण राऊत आणि त्यांच्या संपूर्ण टीमने विशेष सहकार्य केले. बँकेच्या अधिकाऱ्यांनी कचरा वेचकांच्या वस्त्यांमध्ये जाऊन आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, मार्गदर्शन आणि जनधन खाते उघडण्याची प्रक्रिया सुलभ केली. त्यामुळे अनेक कष्टकरी प्रथमच औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले. या सामाजिक बांधिलकीबद्दल लाभार्थींनी अरुण राऊत व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष आभार व्यक्त केले. नागापूर येथे राबविण्यात आलेला हा उपक्रम केवळ बँक खाते उघडण्यापुरता मर्यादित नसून, असंघटित कचरा वेचकांना सामाजिक सुरक्षा, आर्थिक समावेशन आणि शासनाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. सामाजिक संस्था, बँका आणि प्रशासन यांच्या समन्वयातून शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचू शकणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ २४ जुलैला एकदिवसीय अन्नत्याग

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

पर्यावरणवादी, वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर केंद्र सरकारकडून दडपशाही केली जात असल्याचा आरोप करत, त्यांच्या समर्थनार्थ शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी देशभरातील तसेच परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीयांनी 'एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन' करावे, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने करण्यात आले आहे. हे आंदोलन हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरोधात असून लोकशाही, संविधान, अहिंसा आणि नागरिकांच्या शांततामय आंदोलनाच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे. संघटनांच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे की, भ्रष्ट शैक्षणिक व्यवस्थेविरोधात सोनम वांगचुक यांनी अहिंसक सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला आहे. दीर्घकाळ उपोषण केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी बळाचा वापर करून त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयातूनही त्यांचे उपोषण सुरू आहे. त्यांच्या आरोग्यावर वैद्यकीय तज्ज्ञांकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक संवाद साधण्याऐवजी आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. २४ जुलैचे अन्नत्याग आंदोलन पूर्णपणे शांततामय, अहिंसक आणि संविधाननिष्ठ असेल.

# पारनेरच्या श्री गणेश मंदिरातील ऐतिहासिक शिलालेख प्रकाशझोतात

**इ.स. १८४० मधील मंदिराच्या शिखर बांधणीची नोंद । 'सत्क्षेत्र पारनेर'चा ऐतिहासिक पुरावा**

■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पारनेर गावाच्या पूर्व वेशीबाहेरील श्री गणेश मंदिराच्या गाभाऱ्यातील प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूच्या वरच्या भागात एक ऐतिहासिक शिलालेख आढळून आला आहे. उठाव स्वरूपातील हा पाच ओळींचा शिलालेख देवनागरी लिपीत मराठी भाषेत कोरलेला असून, रंगरंगोटी व वातावरणाच्या परिणामामुळे अक्षरे पुसट झाली असली तरी प्रयत्नपूर्वक त्याचे वाचन करण्यात आले.

**शिलालेख वाचन :**

**१. श्री गणेशायनमा: श्री गणेश चरणी तत्पर आ**

**२. वजी वा खंडुजी आवटी निरंतर स्वस्ति**

**३. श्रीनृप शालिवाहन शके १७६२ शार्वरी ना**

**४. म संवछरें आश्विन शुद्ध दशमी श्री गणे**

**५. श शिखरे रचिले सत्क्षेत्र पारनेर शुभ**

ऐतिहासिक अर्थ

शिलालेखाची सुरुवात श्री गणेशाय नमः या मंगलाचरणाने झाली असून, श्री गणेश चरणी तत्पर या उल्लेखातून गणेशभक्ती व धार्मिक समर्पण स्पष्ट होते. यात आवजी वलद खंडुजी आवटी पाटील यांचा उल्लेख असून, त्यांनी मंदिराच्या धार्मिक कार्यात योगदान दिल्याचे दिसून येते.

शिलालेखात शालिवाहन शक १७६२, शार्वरी संवत्सर, आश्विन शुद्ध दशमी अशी कालनोंद असून त्यानुसार हा लेख इ.स. १८४० मधील आहे. विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर मंदिराचे शिखर बांधण्यात आल्याची नोंद श्री गणेश शिखरे रचिले या उल्लेखातून मिळते. तसेच सत्क्षेत्र पारनेर या शब्दप्रयोगातून त्या काळात पारनेरचे धार्मिक महत्त्व अधोरेखित होते.

शिलालेखाचे महत्त्व

हा शिलालेख पारनेर परिसरातील एकोणिसाव्या शतकातील धार्मिक, सामाजिक आणि स्थापत्य इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा आहे. स्थानिक भक्त, दाते आणि समाजाच्या सहभागातून मंदिरनिर्मिती व धार्मिक कार्ये होत असल्याचे यावरून स्पष्ट होते. गणेश उपासनेची परंपरा, स्थानिक व्यक्तींचे योगदान, शालिवाहन शकातील कालगणना आणि मंदिर स्थापत्याच्या अभ्यासासाठी हा शिलालेख महत्त्वाचा ठरतो.


■ छाया । विजय उंडे

■ **गाव :** पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
■ **स्थळ :** पूर्व वेशीबाहेरील श्री गणेश मंदिर, गाभाऱ्याच्या भिंतीवर
■ **लिपी व भाषा :** देवनागरी लिपी, मराठी भाषा
■ **काल :** शके १७६२ (इ.स. १८४०), ब्रिटिश काळ
■ **देवता :** श्री गणेश
■ **व्यक्ती :** आवजी वलद खंडुजी आवटी पाटील
■ **प्रयोजन :** श्री गणेश मंदिराचे शिखर बांधल्याची स्मृती जपणे
■ **शिलालेख, माहिती, संकलन व वाचन :** श्री. अनिल किसन दुधाणे.

## अकोले तालुक्यात विद्यार्थी पाठ्यपुस्तकांपासून वंचित; चौकशीची मागणी

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप**

● **अकोले । वीरभूमी –**

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून राज्यात नवीन अभ्यासक्रम लागू झाला असला, तरी शैक्षणिक वर्ष सुरू होऊन महिनाभराहून अधिक कालावधी उलटल्यानंतरही अकोले तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश साळवे यांनी केला असून, या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

साळवे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नवीन अभ्यासक्रमानुसार अध्यापन सुरू असताना विद्यार्थ्यांच्या हातात पाठ्यपुस्तकेच नसल्याने शिक्षकांसमोरही अडचणी निर्माण झाल्या आहेत. नवीन अभ्यासक्रम आणि जुन्या पुस्तकांमध्ये मोठा फरक असल्याने जुन्या पुस्तकांच्या आधारे प्रभावी अध्यापन करणे शक्य होत नाही. विद्यार्थ्यांना धडे वाचणे, सराव करणे, गृहपाठ पूर्ण करणे आणि स्व–अध्ययन करणेही कठीण झाले आहे.

नवीन अभ्यासक्रम लागू करताना पाठ्यपुस्तके वेळेत उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी होती. मात्र, अभ्यासक्रम सुरू झाल्यानंतरही पुस्तके विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेली नाहीत. बाजारातही नवीन पाठ्यपुस्तके उपलब्ध नसल्याने पालकांची मोठी गैरसोय होत आहे. काही ठिकाणी पुस्तके नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी असून, काही विद्यार्थी शाळेत जाण्यासही नकार देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तक संच तातडीने उपलब्ध करून द्यावेत. तसेच वितरण प्रक्रियेचा आढावा घेऊन विलंबाची कारणे शोधावीत आणि निष्काळजीपणाबाबत दोषींवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी प्रकाश साळवे यांनी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिक्षण विभाग, अकोले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दरम्यान, पालकांमध्येही या प्रश्नावर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम शिकविला जात आहे; मात्र त्यासाठी आवश्यक पाठ्यपुस्तकेच उपलब्ध नसतील, तर त्यांच्या शैक्षणिक नुकसानाची भरपाई कोण करणार? असा सवाल पालक आणि शिक्षणप्रेमींनी उपस्थित केला आहे.

## सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ पारनेरमध्ये केंद्र सरकारच्या भूमिकेचा निषेध करत तहसीलदारांना निवेदन

● **पारनेर । वीरभूमी–**

प्रसिद्ध शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसेवक सोनम वांगचुक यांनी 'नीट' परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणांविरोधात सुरू केलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत पारनेर येथे विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या वतीने तहसीलदार गायत्री सौंदणे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात सोनम वांगचुक यांनी उपस्थित केलेले प्रश्न देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असल्याचे नमूद करण्यात आले. त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करण्याऐवजी प्रशासनामार्फत त्यांना उपोषणापासून परावृत्त करण्यासाठी करण्यात येत असलेली कारवाई लोकशाहीविरोधी व अन्यायकारक असल्याचा आरोप करण्यात आला.

या आंदोलनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), भीमशक्ती संघटना, आरपीआय (आठवले गट), भीम आर्मी (पारनेर), स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष तसेच संविधान व लोकशाही जागर समिती यांसह विविध पुरोगामी संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी सरकारविरोधी घोषणाबाजी करत लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनांवर दडपशाही होत असल्याचा आरोप केला. सरकारने भूमिका बदलली नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला.

तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे या प्रकरणाची तातडीने दखल घेण्याची मागणी करण्यात आली. तसेच सोनम वांगचुक यांच्या न्याय्य मागण्या पूर्ण होईपर्यंत पुरोगामी संघटना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहतील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला.

देशातील शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी, 'नीट' परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि त्याविरोधात आवाज उठविणाऱ्यांवर होणारी कारवाई ही लोकशाहीला मारक असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त करत या घटनेचा तीव्र निषेध नोंदविला.


■ छाया । भगवान गायकवाड

# पारनेर बसस्थानक परिसरातील तुंबलेल्या गटारींवर संताप

**अस्वच्छतेमुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर । तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

● **पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसरात तुंबलेल्या गटारींमुळे मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता पसरली असून, प्रवासी आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या समस्येकडे नगरपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत संतप्त नागरिकांनी मुख्याधिकारी प्रियांका शिंदे यांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

बसस्थानक परिसरातून दररोज हजारो प्रवासी, विद्यार्थी आणि नोकरदारांची ये–जा असते. मात्र, मुख्य गटार तुंबल्याने दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावर वाहत असून, पावसामुळे ते अनेक ठिकाणी साचत आहे. त्यामुळे परिसरात डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू, मलेरिया आणि कॉलरासारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

दुर्गंधीमुळे प्रवाशांना बसस्थानकात थांबणे कठीण झाले असून, दुकानांसमोर सांडपाणी साचल्याने व्यापाऱ्यांनाही मोठा फटका बसत आहे. ग्राहकांची वर्दळ कमी झाल्याने व्यवसायावर परिणाम होत असल्याची तक्रार व्यापाऱ्यांनी केली आहे.

स्थानिक नागरिक आणि माध्यमांनी वारंवार या समस्येकडे लक्ष वेधूनही प्रशासनाकडून केवळ तात्पुरत्या उपाययोजना केल्या जात असून, कायमस्वरूपी तोडगा काढला जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या पार्श्वभूमीवर किरण बाळासाहेब सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्याधिकारी प्रियांका शिंदे यांची भेट घेऊन बसस्थानक परिसरातील गटारींची तातडीने स्वच्छता करावी आणि सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

प्रशासनाने येत्या काही दिवसांत ठोस कार्यवाही केली नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

या निवेदनावर किरण सोनवणे, दिनेश गट, आरिफ शेख, अक्षय औटी, शीतल औटी, मनोज औटी, रमेश कुलट, विजय पठारे, ज्योती गट, बाळासाहेब बुगे, भारती औटी, रविंद्र शिंदे, पितळे, नजीर तांबोळी, दिनेश चौधरी आदी नागरिकांच्या सह्या आहेत. आता या प्रश्नावर नगरपंचायत प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.


■ छाया । भगवान गायकवाड

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# जिल्हा बँक निवडणुकीत जिल्ह्याची हवा श्रीगोंद्यात दिसणार

## जिल्हा बँकेत जाणे पाचपुतेंना ४५ वर्षात जमले नाही ते यावेळी शक्य होणार का? याचीच उत्सुकता

■ विजय उंडे

● श्रीगोंदा । वीरभूमी –
अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीचा इतिहास पाहता विखे विरोधी पॅनलला कायम झुकते माप मिळाले आहे. जिल्ह्याचे पक्षीय पातळीवरचे सगळेच समीकरणे बदलले असल्याने माजी मंत्री बाळासाहेब थोरात व खा. निलेश लंके यांनी दोन पावले मागे येत पक्षीय पातळीवर जिल्हा बँकेची निवडणूक न नेता बँकेच्या निवडणुकीत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना ताकद देत भाजपचाच परंतु विखे विरोधी चेअरमन होईल अशी राजकीय व्यूहरचना आखली आहे.

जिल्हा बँकेच्या होऊ घातलेल्या अहमदनगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीला अनेक कंगोरे आहेत त्यात भाजपामधील राज्यस्तरावरील व राष्ट्रीय स्तरावरील अंतर्गत राजकीय स्पर्धांचा समावेश आहे. मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शहा यांच्याशी चांगलेच जुळवून घेतले आहे. भाजपामधील भविष्यातील संभाव्य मुख्यमंत्र्यांच्या यादीत राधाकृष्ण विखे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. भाजपामधील एका गटाला जिल्ह्याच्या राजकारणात जाणीवपूर्वक राज्यस्तरावरून ताकद पुरवली जात आहे. विखे विरोधी असलेल्या आ. सत्यजित तांबे, आ. विवेक कोल्हे, आ. प्राजक्त तनपुरे यांना विधानपरिषदेतून आमदारकी देणे व प्रा. राम शिंदे यांचा दोनदा पराभव होऊनही त्यांना विधानपरिषदेवर घेऊन सभापती करणे हा या व्यूवहरचनेचाच एक भाग आहे.






मध्यंतरी राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार हे बाय कारने पुण्याहून संगमनेर मार्गे प्रवरानगरला आले होते. खा. पवार यांनी खा. निलेश लंके यांना त्यावेळी पुण्याला बोलावून घेतले होते. संगमनेर मधून थोरातांना शरद पवार यांनी त्यांच्या गाडीत घेतले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीबाबत या निघांमध्ये गाडीत जे गुफ्तगू झाले त्या राजकीय रणनीतीचे पडसाद बरोबर नेमक्यापणाने सध्या घडत आहेत. कर्जत – जामखेडमध्ये विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे कर्जत व जामखेड या दोन्ही तालुक्यात एकांगीपणे त्यांच्या मर्जीतील ठराव करून घेत असताना त्यांचे कट्टर विरोधक असलेले आ. रोहित पवार यांनी चुप्पी धरणे हा याच रणनीतीचा भाग असल्याचे बोलले जाते.

सभापती प्रा. राम शिंदे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी खासदार यशवंतराव गडाख, खा. निलेश लंके, आ. विवेक कोल्हे यांचा जिल्हा बँकेत एकत्रित पॅनल होण्याची शक्यता आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना विखे समर्थकांचा पॅनल करण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही असेच आजचे चित्र आहे. शेवगावचे घुले व कोपरगावचे काळे कोणत्या पॅनलमध्ये दिसतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

इकडे श्रीगोंद्यात माजी आमदार राहुल जगताप सोसायटी मतदारसंघातून लढण्यात इच्छुक असून प्रा. राम शिंदे यांच्या गटाकडून त्यांची उमेदवारी निश्चित मानली जाते. स्व. शिवाजीराव कर्डिले हे चेअरमन होताना जी गडबड झाली त्यावेळी दबक्या आवाजात राहुल जगताप यांचाही उल्लेख व्हायचा मात्र त्यांची जबाबदारी सर्वस्वी प्रा. राम शिंदे यांनी घेतली असल्याने त्यांचा निवडणुकीचा मार्ग सुकर होण्याची दाट शक्यता आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी माजी आमदार राहुल जगताप व राजेंद्र नागवडे या दोघांची एकत्रित पंधरा दिवसांपूर्वी श्रीगोंद्यातील महाविद्यालयात बैठक झाली. त्या बैठकीचा परिपाक म्हणून माजी आमदार राहुल जगताप यांच्या ताब्यात असलेल्या खरेदी- विक्री संघाचा ठराव बँकेच्या निवडणुकीसाठी राजेंद्र नागवडे यांच्या नावाने केला गेला. नंतर दुसऱ्याच आठवड्यात पाचपुते व नागवडे यांची मुंबईत बैठक झाल्याची आवई उठवण्यात आली.

### जिल्हा बँकेच्या निवडणुकीवर टांगती तलवार..!

■ नगर जिल्ह्यातील बहुतांशी विविध कार्यकारी सेवा संस्था या थकबाकीत आहेत. त्यामुळे थकबाकीतील संस्थाना संचालक मंडळातील एखाद्या संचालकाला ठराव देता येत नाही. तो ठराव सभासदाला दिला जातो. यावरच आक्षेप घेत एका सभासदाने थेट मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली आहे. संस्था थकबाकीत असल्यावर संचालक जसे थकबाकीत गृहीत धरले जातात तसेच सभासदही आपोआप थकबाकीत असतात. हा मुद्दा उच्च न्यायालयाने ग्राह्य धरला तर ठराव प्रक्रिया पुन्हा होण्याची दाट शक्यता असून यामुळे जिल्हा बँकेची निवडणूकही लांबणीवर जाण्याची शक्यता वाढली आहे.

माजी मंत्री बबनराव पाचपुते यांना जिल्ह्यातील नेत्यांनी यापूर्वी ४५ वर्षात जिल्हा बँकेत येऊ दिले नाही. मध्यंतरी २०१४ साली बबनराव पाचपुते यांच्या पत्नी सौ. प्रतिभा पाचपुते यांना बँकेत जाण्याची संधी तयार झाली होती. त्यावेळच्या सत्ताधारी थोरात – गडाख गटाकडून सोसायटी मतदारसंघातून राजेंद्र नागवडे व महिला प्रतिनिधी म्हणून प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी देण्याचे ठरले होते मात्र पाचपुतेंपर्यंत हा निरोप येण्याच्या आतच त्यावेळचे बबनराव पाचपुते समर्थक असलेल्या भगवानराव पाचपुते यांनी स्व. कुंडलिकराव जगताप यांचे नाव घोषित करून टाकले. कदाचित सौ. प्रतिभा पाचपुते त्यावेळी बँकेच्या संचालिका झाल्या असत्या तर त्यांच्या मालकीच्या साईकृपा हिरडगाव व देवदैठण कारखान्याच्या अडचणी वाढल्या नसत्या. बबनराव पाचपुते यांच्या मालकीचे असणारे साईकृपा व देवदैठण हे दोन्ही साखर कारखाने हे बाबुराव बोत्रे यांना काही दिवसांसाठीच चालवायला दिल्याचे त्यांचे कार्यकर्ते खाजगीत बोलतात. भविष्यात ते पाचपुते यांच्याच हाती येणार असल्याने ते चालवण्यासाठी जिल्हा बँकेत येणे किती महत्वाचे आहे हे उमगल्याने बबनराव पाचपुते यांचे धाकटे चिरंजीव प्रतापसिंह पाचपुते जिल्हा बँकेत जाण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत.

# प्रवरानगरात २२ जुलैला 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर'

### मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते योजनांच्या लाभांचे वितरण

● शिर्डी । वीरभूमी–
राज्य शासनाच्या महसूल व वन विभागातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' अंतर्गत २२ जुलै रोजी सकाळी १० वाजता प्रवरानगर येथील डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचे लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिले जाणार असून, राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते विविध लाभांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती शिर्डीचे उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महसूल विभागाने २२ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांत हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक मतदारसंघात एका दिवशी विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार आहे.

शिर्डी विधानसभा मतदारसंघातील पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ या शिबिरातून देण्यात येणार आहे. कार्यक्रमास खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत असून, शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. या शिबिरासाठी सर्व प्रशासकीय तयारी पूर्ण झाली असून, महसूल, कृषी, आरोग्य, कौशल्य विकास, महिला बचत गट आदी विभागांच्या विविध योजनांतील पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे व लाभाचे साहित्य वितरित करण्यात येणार आहे.

# महालक्ष्मी विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी प्रा. सचिन लगड; उपाध्यक्षपदी नवनाथ जाधव

● अकोले । वीरभूमी–
अकोले तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भागातील तसेच 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात तालुक्यात प्रथम मानांकन मिळविलेल्या पिंपळगाव नाकविंदा येथील महालक्ष्मी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी प्रा. सचिन किसनपाटील लगड, तर उपाध्यक्षपदी नवनाथ नारायण जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली.

विद्यालयाचे प्राचार्य सुनिल धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सहविचार सभा पार पडली. या सभेत अध्यक्ष व उपाध्यक्षांसह १५ सदस्यीय समितीची सर्वानुमते निवड करण्यात आली.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

समितीच्या सचिवपदी प्राचार्य सुनिल धुमाळ, शिक्षक प्रतिनिधी म्हणून रामदास कासार, तर पालक प्रतिनिधी म्हणून देवराम लक्ष्मण बगनर, संदीप गणपत वाळके, कृष्णा विठ्ठल तातळे, संदीप माधव आभाळे, गोरक्ष रामा चावडे, अर्जुन हरिभाऊ लगड, सविता नवनाथ लगड, अश्विनी अक्षय शिंदे, स्वाती दिनेश मुंढे, कविता मारुती बगनर व मंदा पोपट सदगीर यांची निवड करण्यात आली.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर, सचिव मंगेशराव नवले, सरपंच लक्ष्मण सोंगाळ, उपसरपंच मारुती काळे, पोलीस पाटील चंद्रकांत लगड, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बबनराव आभाळे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भाऊसाहेब लगड, स्थानिक स्कूल समितीचे अध्यक्ष मारुती आभाळे, ग्रामस्थ, पालक, शिक्षक व नागरिकांनी अभिनंदन केले.

सभेदरम्यान पालकांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे निरसन करण्यात आले. तसेच शिक्षक प्रतिनिधी रामदास कासार यांनी समितीची उद्दिष्टे, ध्येय व धोरणे यांची माहिती दिली. त्यांनीच सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

प्राचार्य सुनिल धुमाळ म्हणाले, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व विकासात्मक क्षेत्रात सक्रिय असलेल्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निश्चितच उपयोग होईल. शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे आणि पालक–शाळा समन्वय अधिक दृढ करण्यासाठी समिती प्रभावी योगदान देईल.

अध्यक्ष प्रा. सचिन लगड म्हणाले, स्थानिक समुदाय, पालक आणि शिक्षकांचा शालेय कामकाजात सहभाग वाढवून शाळेचा सर्वांगीण विकास करणे हा समितीचा मुख्य उद्देश आहे. शाळा आणि गाव यांच्यात सातत्याने संवाद राहिल्यास शैक्षणिक गुणवत्ता निश्चितच उंचावते. गुणवत्तावृद्धीसाठी समिती पूर्ण क्षमतेने प्रयत्न करेल.

# ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांवर पुण्यात राज्यस्तरीय विचारमंथन

## आरोग्य, शिक्षण, पोषण व सामाजिक सुरक्षेसाठी ठोस उपाययोजनांची मागणी । उचल फाउंडेशनचे सचिन खेडकर यांनी मांडल्या महत्त्वाच्या सूचना

● शेवगाव । वीरभूमी –
ऊसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना स्थलांतराच्या काळात आरोग्य, शिक्षण, पोषण आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा प्रभावी लाभ मिळावा, या उद्देशाने मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (एमजीव्हीएस) यांच्या पुढाकाराने पुणे येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय विचारमंथन कार्यशाळा पार पडली.

कार्यशाळेला साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, समाजकल्याण विभागाचे सहआयुक्त डॉ. प्रमोद जाधव, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या डॉ. प्रेरणा यांच्यासह विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी आणि राज्यभरातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ऊसतोड कामगारांच्या समस्या, शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी आणि उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



■ छाया । अमोल कराळे

शेवगाव येथील उचल फाउंडेशनचे सचिन खेडकर यांनी गर्भवती महिलांवरील श्रमाचा ताण, आरोग्य सुविधांचा अभाव, कुपोषण, रक्तक्षय, अकाली प्रसूती, बालमृत्यू तसेच वाढत्या हिस्टरेक्टॉमी शस्त्रक्रियांबाबत चिंता व्यक्त केली. स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण खंडित होणे, शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या वाढणे, मुलींचे शिक्षण अर्धवट राहणे, बालविवाह आणि अल्पवयीन मातांचे वाढते प्रमाण या गंभीर सामाजिक प्रश्नांकडेही त्यांनी लक्ष वेधले.

मोबाईल आरोग्य व्हॅन, प्रत्येक साखर कारखान्यावर निवासी डॉक्टर, नियमित आरोग्य शिबिरे, गर्भवतींची तपासणी, महिलांसाठी स्वच्छतागृहे, सॅनिटरी नॅपकिन, सुरक्षित निवास, आरोग्य विमा, मजुरीत वाढ तसेच कारखाना परिसरात अंगणवाडी, पाळणाघर आणि पूरक आहाराची सुविधा उपलब्ध करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तसेच स्थलांतरित मुलांना जवळच्या शाळांमध्ये प्रवेश देऊन शिक्षण सुरू ठेवणे, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून समुपदेशन व पुनर्प्रवेशाची व्यवस्था करण्याची सूचनाही करण्यात आली.

कामगारांना दिली जाणारी उचल रक्कम पती–पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात जमा करावी, त्यामुळे महिलांचा आर्थिक निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढेल आणि मुलांच्या शिक्षण, आरोग्य व पोषणासाठी निधीचा योग्य वापर होईल, असे मतही व्यक्त करण्यात आले. याशिवाय ऊसतोड कामगार, मुकादम आणि साखर कारखाने यांच्यात समन्वयासाठी सामाजिक संस्थांची नियुक्ती, गर्भवती महिलांना प्रसूती रजा आणि सर्व कामगारांची अधिकृत नोंदणी करण्याची मागणी करण्यात आली.

डॉ. सोमनाथ घोळवे यांनी ऊसतोड कामगार कायद्यात आवश्यक सुधारणा, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण आणि सामाजिक सुरक्षा अधिक सक्षम करण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेत मांडलेल्या सूचनांच्या आधारे शासन, प्रशासन, साखर उद्योग आणि स्वयंसेवी संस्थांचा संयुक्त कृती आराखडा तयार करण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. ही कार्यशाळा मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (एमजीव्हीएस)चे अप्पासाहेब उगले यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली.